**प्रेसनोट दिनांक ०३/०८/२०२४**

# अभिलेखावरील सराईत मोबाईल चोरास अटक करून चोरीचे एकुण १६ मोबाईल हस्तगत केलेबाबत

मुंबई शहरात मोबाईल चोरीच्या गुन्हयांचे वाढते प्रमाण पाहता अभिलेखावरील मोबाईल चोरीचे आरोपीतांवर लक्ष ठेवण्यात येत असते.

दा. नौ. नगर पोलीस ठाणे येथील सराईत मोबाईल चोर नामे मोहम्मद साबीर अहमद शेख उर्फ साबीर बाकडा वय ४२ वर्षे, रा.ठि जोगेश्वरी पुर्व, मुंबई याचे हालचालीवर लक्ष ठेवले असता त्याचा दा.नौ. नगर पोलीस ठाणे, गु.र.क्र. २४७/२४, कलम ३८० भादंवि या गुन्हयात सहभाग निष्पन्न झाला. म्हणून त्यास सापळा रचुन ताब्यात घेण्यात आले.

नमुद आरोपीताकडे कौशल्यपुर्ण तपास करून एकुण १६ मोबाईल अंदाजे एकुण किंमत १,६०,०००/- रूपये हस्तगत करण्यात आले आहेत. नमुद आरोपीताकडून हस्तगत केलेले मोबाईल हे जोगेश्वरी, मालाड, अंधेरी या ठिकाणावरून चोरी केल्याचे तपासात निष्पन्न झाले आहे. तसेच मोबाईल मालकांचा शोध घेवून पुढील तपास करीत आहे. सदर आरोपीत याचेविरुदध मेघवाडी,जोगेश्वरी तसेच दा नौ नगर पोलीस ठाणे येथे मोबाईल चोरीचे गुन्हे दाखल आहेत.

सदरची कामगिरी दा.नौ. नगर पोलीस ठाणेचे गुन्हे प्रकटीकरण अधिकारी स.पो. नि. श्री. सुनिल घाडगे, पो.ह. श्री. पाटील, पो.ह. श्री. गायकवाड, पो. ह. श्री. हळदे, पोशि श्री. पांढरे, पोशि श्री. रांजणे यांनी पार पाडली आहे.

--------oo-------